ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २४ | पुणें, बुधवार तारीख ११ फेब्रुवारी, १९५८ | अंक ७

## विविध माहिती

**अमेरिकेची नेपाळला मदत**—नेपाळमधील सध्यांच्या अन्नधान्याच्या टंचाईला तोंड देण्यासाठी नेपाळ सरकारनें अमेरिकेकडे मदतीची याचना केली होती. नेपाळमधील परिस्थिति लक्षांत घेऊन अमेरिकेनें दुष्काळ निवारणाच्या कायद्याला अनुसरून २०,००० टन गहूं देण्याचें कबूल केलें आहे. त्याशिवाय इतरहि कांहीं अन्नधान्य देण्यांत येणार आहे.

**अमेरिकेंतील दारिद्र्यानें धक्का**—अमेरिकन सिनेटच्या बँकिंग व फायनॅन्स कमिटीचे सभासद सिनेटर गोअर ह्यांनीं अमेरिकेंतील दारिद्र्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. गरजू बेकारांना फुकट अन्न देण्याची जी योजना आहे, तीप्रमाणें ते बेकारांची मुलाखत घेत होते. देशांतील १० टक्के लोक ह्या मदतीचा फायदा घेत असल्याचें त्यांनीं जाहीर केलें आहे.

**श्रमदानानें शाळेची इमारत**—श्रीरामपूर तालुक्यांतील पढेगांवच्या लोकांनीं प्रजासत्ताक दिनाच्या दिवशीं गांवांत शाळेसाठी नवी इमारत बांधण्याचें ठरविलें. ह्या इमारतीसाठी ती कंत्राट देऊन बांधावयाची झाल्यास ४०,००० रुपये लागतील त्यापैकी २०,००० रुपयांचें काम गांवकऱ्यांनीं श्रमदानानें करावयाचें ठरविलें आहे. इमारत पुढील वर्षीं तयार होईल.

**रेल्वेचा नवा फाटा**—भारताच्या ईस्टर्न रेल्वेवर रुंद रुळाच्या रेल्वेचा ९ मैल लांबीचा एक नवीन फाटा बांधण्यांत येणार आहे. पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथें बांधण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्याला अशुद्ध लोखंडाचा पुरवठा करणें सुलभ जावें ह्या हेतूनें तो मुख्यतः बांधण्यांत येत आहे. ह्या कामासाठी रेल्वेबोर्डानें १·२४ कोटी रुपयांची रक्कम मंजूर केली आहे.

**प्राचीन विहिरीचा शोध**—नागार्जुनकोंडा येथील धरणाच्या कामीं उत्खनन चालूं असतां एक प्राचीन विहीर सांपडली आहे. विहीर ६० फूट खोल असून १६० फूट व्यासाची आहे. मध्ययुगीन राजांच्या लष्करांसाठी ती खोदण्यांत आली असावी असा तर्क करण्यांत आला आहे.

**सागरी वहातुकीची सोय**—मद्रास व पूर्व आशिआ ह्यांच्या दरम्यान प्रवास करणाऱ्या बोटींना मार्गदर्शन करतां यावें म्हणून अंदमान द्वीपसमूहांतील एका बेटावर नवीन दीपस्तंभ बांधण्यांत येणार आहे. सध्यां अशा मार्गदर्शनाची सोय नाहीं. दीपस्तंभाच्या कामासाठी जरूर ती प्रादेशिक पहाणी लवकरच करण्यांत येणार आहे.

**ब्रिटिश भांडवलाची गुंतवणूक**—भारतामधील उद्योगधंद्यांच्या वाढीबद्दल ब्रिटनला बरीच आस्था वाटते, आणि कांहीं ब्रिटिश उद्योगपती भारतामधील खाजगी उद्योगधंद्यांच्या विभागांत भांडवल गुंतविण्याचा विचार करीत आहेत, अशी माहिती भारतामधील ब्रिटनचे ट्रेड कमिशनर, श्री. सी. एच. बेलीस, ह्यांनीं सांगितली आहे.

**दाढी करण्याचीं पातीं**—दाढी करण्याचीं पातीं तयार करणाऱ्या भारतामधील कारखान्यांना सध्यां चांगले दिवस आले आहेत. १९५७ सालीं ह्या कारखान्यांनीं ३६·५ कोटी पातीं तयार केलीं असा अंदाज आहे. १९५६ सालीं २६·५ कोटी पातीं निर्माण करण्यांत आलीं होतीं. परदेशी पात्यांना बंदी करण्यांत आल्यामुळें ही भरभराट लाभली आहे.

**जिराफच्या हृदयाचा अभ्यास**—जिराफ ह्या प्राण्याच्या हृदयापासून त्याचें डोकें १२ फूट अंतरावर असतें. इतक्या उंचीवर सतत रक्ताचा पुरवठा करण्यासाठी त्याचा रक्तदाबहि तसाच असतो. मनुष्याला होणाऱ्या रक्तदाबाच्या विकारांवर उपाय शोधून काढण्यासाठी कांहीं अमेरिकन शास्त्रज्ञ जिराफांच्या हृदयव्यापाराचा अभ्यास करीत आहेत.

**नीरा व ताडगूळ ह्यांची उपयुक्तता**—डहाणू येथील शाळकरी मुलांना सकस अन्न देण्याचा प्रयोग नुकताच करण्यांत आला असतां, ह्या वस्तूंचा आहारांत चांगला उपयोग होतो असें आढळून आलें. रोज दोन पेले नीरा व दोन औंस ताडगूळ मुलांना सहा महिने देण्यांत आला होता. ह्या कालांत मुलांचें वजन वाढल्याचें दिसून आलें.

**तांदुळावरील निर्बंध रद्द करा**—छत्तिसगढ जिल्ह्यांतील धान्य-व्यापारी मंडळानें मध्यप्रदेशाच्या शेतीमंत्र्यांची गांठ घेऊन राज्यांतील तांदूळ बाहेर पाठविण्यावर सध्यां जी बंदी आहे, ती रद्द करण्याची विनंती केली. छत्तिसगढ भागांतील भाताच्या गिरण्यांतून २८ लाख मण तांदूळ पडून असल्यानें तांदुळाच्या किंमती घसरल्या असल्याचें त्यांनीं मंत्र्यांच्या निदर्शनास आणलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## भिवंडी सोसायटीच्या बाजूनें को. ट्रायब्यूनलचा निकाल

भिवंडी वीव्हर्स सोसायटी लि. नें बॉंबे स्टेट इं. को. असोसिएशनकडून सुताच्या गांठी घेण्याचा करार केला होता. ६० नंबराच्या, डबल वीव्हच्या, रंगीत सुताच्या, ३० गाठींबाबत हा करार होता. करारांतील अटीप्रमाणें योग्य त्या दर्जाचें सूत असोसिएशननें न पुरविल्यामुळें भिवंडी सोसायटीचें नुकसान झालें. तें भरून देणाऱ्या, रजिस्ट्रारच्या नॉमिनीचे अवार्डवर असोसिएशननें को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलकडे अपील केलें. पण, ट्रायब्यूनलनें अपील फेटाळून लावून भिवंडी सोसायटीला रिफंड, व्याज व खर्च ह्यापोटीं ७४,२४४ रु. देवविलें.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या सभासदांसाठी

## नोटिस

मा. बॉम्बे को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनलनें निवडणूक अपील नं. २६६/१९५७ चे कामीं दिलेल्या हुकुमानुसार पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या डायरेक्टरांच्या निवडणूक-नियमांत निर्देश केलेल्या मतदारसंघापैकी (ग्रुप विभाग) नं. ७ (बारामती) यांतील शेतकी सह. सोसायट्यांमधून बँकेच्या संचालक मंडळावर सन १९५७-५८ सालाकरितां निवडून यावयाच्या (एका) प्रतिनिधीची फेरनिवडणूक व्हावयाची आहे.

सदरची निवडणूक रविवार दिनांक २३-२-१९५८ रोजीं बँकेच्या मुख्य कचेरींत होणार असून मतदानाची वेळ सकाळीं ८-३० ते १२ अशी ठरविण्यांत आली आहे.

निवडणुकीसाठी खालील चार उमेदवार उभे आहेतः—

[ जागा १ ]

(१) श्री. काकडे बाबुलाल साहेबराव
(२) श्री. काकडे मुगुटराव साहेबराव
(३) श्री. घुमाळ बबुराव बळवंतराव
(४) श्री. सातव धोंडिबा आबाजी

मतदानाचा अधिकार असलेल्या सोसायट्यांच्या प्रतिनिधींचीं नांवें छापलेली यादी प्रत्येक सोसायटीकडे सन १९५७ च्या जुलैमध्यें नियमानुसार पाठविण्यांत आली आहे. सदर यादीमध्यें अधिकृत म्हणून नांवें दाखल असलेल्या प्रतिनिधींनाच या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार आहे.

निवडणुकीचा निकाल चिकित्सा मंडळाचे अध्यक्ष हे दि. २३-२-५८ रोजीं सायंकाळीं जाहीर करतील.

संचालक मंडळाच्या हुकुमावरून
पुणें २. दि. ५-२-५८
वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर


## तासगांव बँकेची नवी इमारत

दि तासगांव अर्बन को. बँकेच्या नवीन इमारतीचा उद्घाटन-समारंभ सोमवार, दि. १० रोजीं ना. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्तें झाला.

दि. ११ रोजीं ना. चव्हाणांनीं वावची येथील अप्रोच रस्ता, चावडी व शाळा ह्यांचें उद्घाटन केलें.

## पुरुषोत्तम नारायण गाडगीळ आणि कं.

सांगली येथील वरील नांवाची १२५ वर्षांची सराफी पेढी सुप्रसिद्धच आहे. तिचें पुणें येथील दुकान लक्ष्मीरोडवर कुंटे चौकांत ९ फेब्रुवारीपासून सुरू झालें. त्याचा उद्घाटन-समारंभ सांगलीच्या राजेसाहेबांचे हस्तें झाला.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

साखरेचें उत्पादन जोरांत चालू असून
आतांपर्यंत साखरेचें उत्पादन
१,१०,००० (एक लक्ष दहा हजार) पोतीं झालें आहे.
चालू हंगाम एप्रिल १९५८ अखेर चालेल.

★ मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात ★

—संचालक मंडळ—

दि. ब. एन्. सी. लिमये, B. A., LL. B., C. B. E., अध्यक्ष.
श्री. आ. पां. कोंडे देशमुख, जमीनदार व व्यापारी
श्री. शं. ल. लिमये, वकील, B. Sc., LL. B.
श्री. भ. ग. भाडुले, वकील, B. Sc., LL. B.
श्री. शं. म. कोंडे देशमुख, व्यापारी
श्री. ग. ह. सवनीस
रा. ब. अ. गुं. गोखले, M. A., B. Sc., F. R. I. C., A. I. I. Sc.
श्री. दा. वा. पोतदार, B. E. (Mech.), B. E. (Elec.), A. M. I. E.
श्री. श्री. र. केसकर, वकील
श्री. रामराव देशमुख, M. A., LL. B., (Cant.) Bar-at-Law, M. P.
श्री. शं. ल. किर्लोस्कर, B. Sc. (Mit.) U. S. A.

९८० सदाशिव पेठ, पुणें २.

के. व्यं. चांफेकर, B. E., A. M. I. E.
मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. १२ फेब्रुवारी, १९५८



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## क्षयरोगावरील इलाजाच्या सोयी

भारतामधील लोक ज्या अनेक रोगांमुळें मृत्युमुखीं पडतात, त्यांत क्षयरोगाचा अनुक्रम पहिला लागतो. लोकांच्या आरोग्यावर घाला घालणाऱ्या ह्या रोगाविरुद्ध गेल्या कांहीं वर्षांत अनेक प्रकारांनीं मोहीम चालविण्यांत येत आहे. क्षयरोगप्रतिबंधक लस टोंचण्यामुळें ह्या रोगाचा प्रसार होण्यास प्रतिबंध होतो. २५ वर्षे वयाच्या खालील जीं माणसें क्षयरोगाला बळी पडण्यासारखी असतील, त्यांना ही लस टोंचण्यांत यावयाची आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस हें काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. ह्या उपायांप्रमाणेंच प्रत्येक जिल्ह्यांत एक क्षयरोग–चिकित्साकेंद्र स्थापन करण्याचेंहि ठरलें आहे. ह्या कामासाठीं १२७·५० लाख रुपयांच्या रकमेची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि, फक्त अशा मार्गांनीं क्षयरोगाला आळा घालणें विशेष फलदायी होणार नाहीं. क्षयरोगाची बाधा झालेल्या माणसांची इस्पितळांत अधिक प्रमाणांत सोय करण्यांत येणें जरूर आहे. सध्यां अशी परिस्थिति आहे कीं, क्षयरोग्यांना लागणाऱ्या खाटा पुरेशा नाहींत. मुंबई सारख्या मोठ्या शहरांतहि अवघ्या ६६० खाटांची व्यवस्था आहे. क्षयरोगाची बाधा मुख्यत: कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांना होते असें आढळून येतें. ह्या लोकांना क्षयावर करण्यांत येणारे दीर्घकालीन व खर्चाचे उपाय परवडणारेहि नसतात. म्हणून घरांतल्या घरांतच करण्यासारख्या उपायांचा प्रसार अधिक करण्यांत आला पाहिजे. क्षयरोगाच्या प्राथमिक अवस्थेंत योग्य तो वैद्यकीय सल्ला मिळाल्यास रोग्याला आधुनिक औषधांच्या साह्यानें घरींच उपचार घेतां येण्यासारखा आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. अशा प्रकारची घरीं वापरतां येण्यासारखी उपचारपद्धति मुंबई कॉर्पोरेशननें सुरूहि केली आहे.

## मच्छीमारीच्या धंद्याचा विकास

केरळमधील मच्छीमारीचा धंदा करणारे कोळी आणि त्या धंद्याशीं संबंध असणारे इतर लोक ह्यांची एक परिषद् सरकारतर्फे भरविण्यांत आली होती. केरळ सरकारच्या मच्छीमारी खात्यानें पुढाकार घेऊन भरविलेल्या ह्या परिषदेला ५५ प्रतिनिधी राज्याच्या निरनिराळ्या भागांतून आले होते. ह्या धंद्याचा विकास करण्यासाठीं व त्यामधील अडचणींचा निरास करण्यासाठीं परिषदेंत उपाय सुचविण्यांत येणार आहेत. विषयाचा सर्वांगीण अभ्यास करण्यासाठीं समुद्रांतील मच्छीमारी, गोड्या पाण्यांतील मच्छीमारी, सहकारी संस्था, बाजारपेठा, इत्यादि बाबींचा स्वतंत्र विचार करणारे गट पाडण्यांत आले आहेत. खुद्द कोळ्यांच्या तोंडूनच त्यांच्यापुढील प्रश्नांची माहिती करून घ्यावी, असा सरकारचा हेतु आहे. केरळ राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या धंद्याच्या विकासासाठीं ७७ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्याशिवाय, कोळ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं आणखी वेगळी रक्कम खर्च करण्यांत यावयाची आहे. राष्ट्रीय विस्तारयोजना आणि समाजविकास योजना ह्या संघटनांतर्फे कांहीं रक्कम खर्च करण्यांत येणार आहे. केरळ राज्यांत सुमारें ८०,००० लोक मच्छीमारीच्या धंद्यावर आपली उपजीविका करीत आहेत. दरसाल सुमारें १,१५,००० टन वजनाचे मासे पकडण्यांत येत असतात. भारतांत दरसाल सुमारें १० लाख टनांपेक्षा अधिक मासे पकडण्यांत येतात. त्याच्याशीं तुलना करतां केरळमधील माशांचे उत्पादन सुमारें २३ टक्के आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत हें उत्पादन आणखी निदान ३० टक्क्यांनीं वाढविण्याचा राज्य सरकारचा बेत आहे. अन्नधान्याच्या टंचाईच्या दृष्टीनेंहि हें उत्पादन वाढल्यास हवेंच आहे.

## इंदूरमधील भिक्षेकरी बँकर

भारतामधील मोठ्या शहरांतून भिक्षा मागणाऱ्या लोकांचा प्रश्न बराच अवघड होऊन बसला आहे. भिक्षा मागण्याची पद्धत गुन्हा ठरवावी, म्हणूनहि पुष्कळदां मागणी करण्यांत येते. भिक्षांदेहीचा हा धंदा चांगला किफायतशीर असतो, असें इंदूरमधील भिकाऱ्यांच्या जीवनाची पहाणी केल्यावर आढळून आलें आहे. त्यांच्या जीवनासंबंधींचा हा अहवाल मध्यप्रदेशाच्या समाजशिक्षण कमिटीनें तयार केला आहे. इंदूर हें मध्यप्रदेशाचें व्यापारी केंद्र आहे. त्यामुळें भिक्षेकऱ्यांना तेथें भिक्षा मिळणें कदाचित् सुलभ जात असावें. तें कसेंहि असलें तरी, इंदूरमधील भिक्षेकऱ्यांच्या संख्येंत एकसारखी वाढ होत आहे. गेल्या बारा महिन्यांत भिक्षेकऱ्यांच्या संख्येंत ३०० नवीन माणसांची भर पडली आहे. इतकेंच नव्हे, तर त्यांच्यापैकी कित्येकांनीं हा धंदा किफायतशीर करून दाखविला आहे. इंदूर शहरांत सुमारें २,४०० भिकारी आहेत. त्यांची रोजची कमाई इतकी आहे कीं, कित्येक भिकारी सट्टा खेळतात आणि सावकारीहि करतात. भिकाऱ्यांत ४०० स्त्रिया आहेत, ४ ते १४ वर्षेपर्यंत वय असलेलीं २०० मुलें आहेत, आणि ३८० साधू अथवा फकीर आहेत. एकूण भिकाऱ्यांपैकीं फक्त २०० जणच महारोगी अगर आंधळे आहेत. महारोगानें पछाडलेले ११५ भिकारी मध्यरात्रपर्यंत भटकून कमाई करतात. फेरीवाले, भाजीवाले, इत्यादि इतर धंदेवाल्यांना ते रोजंदारीवर कर्जेंहि देतात. दिवस मावळला कीं ते आपलें मुद्दल व्याजासह वसूल करतात आणि पुन्हां दुसऱ्या दिवशीं पैसे कर्जाऊ देतात. भिकाऱ्यांपैकी कित्येकजण चांगले धट्टेकट्टे आणि तरुण असून कष्टाचीं कामें झेपण्यासारखे आहेत. पण त्यांना भिक्षा मागण्याची संवयच लागली आहे. शिवाय, काम करून होणाऱ्या मिळकतीपेक्षा ह्या मार्गानें त्यांना अधिक पैसा मिळतो.

**रायपूरला स्त्रियांचें नवें कॉलेज**—रायपूर येथील राणी लक्ष्मीबाई शिक्षणसमितीनें १९५८ च्या जुलैपासून स्त्रियांचें स्वतंत्र कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. रायपूरच्या आसपासच्या ८४ लाख लोकवस्तीच्या भागांत स्त्रियांच्या उच्च शिक्षणाची मुळींच सोय नाहीं. रायपूरचे नागरिक २ लाख रुपये जमविणार असून कॉर्पोरेशन १ लाख रुपयांची देणगी देणार आहे.

## पुणें जिल्हा व्यापारी परिषदेचें पहिलें अधिवेशन

### कायद्यांच्या जुलमी अंमलबजाणीवर उपाययोजना करण्यासाठी संघटना

आज गेलीं दहा वर्षे विक्रीकर कायदा, शॉप ॲक्ट, पेमेन्ट ऑफ वेजेस ॲक्ट व तत्सम इतर कायदे अस्तित्वांत आहेत व लहानथोर सर्व व्यापारीवर्ग या कायद्यांच्या एकतंत्री व जाचक अंमलबजावणीमुळें हैराण झाला आहे. कायद्यांच्या अंमलबजावणीचें तंत्रच मुळीं असें चमत्कारिक आहे कीं, लहान सहान चुका त्यासुद्धां अगदीं तांत्रिक कारण लावून व्यापारी वर्गाला अपराधी ठरवावयाचे व अगदीं बारीकसारीक गुन्ह्यासाठीं जबरदस्त दंडाची शिक्षा करावयाची असें जुलमी तंत्र सध्यां संबंधित अधिकारी वापरीत आहेत व दिवसेंदिवस या प्रकारच्या अंमलबजावणीमुळें प्रामाणिकपणें आपला धंदा–रोजगार करणें आज व्यापारीवर्गाला अशक्य झालें आहे.

प्रत्येक कायद्याच्या अंमलबजावणीचे सुरवातीस सरकार कायद्याच्या शुद्ध हेतूविषयीं भूमिका मांडते व अंमलबजावणी न्यायानें व योग्य प्रकारें होईल असें सांगते. पण अनुभव मात्र अगदीं उलटा येतो. वेळोवेळीं सरकारकडे शिष्टमंडळें गेलीं, पत्रव्यवहार झाले अगर फार मोठ्या प्रमाणावर ओरड केली, तरी त्याचा उपयोग होत नाहीं; फक्त उगाच कुठेंतरी दुरुस्तीची ठिगळे लावली जातात. पण कायदा करतांना प्रारंभींच संपूर्ण विचार न केल्यामुळें या अशा तात्कालिक दुरुस्त्यांचा कांहींहि उपयोग होत नाहीं. उलट, आणखी नवीन गोंधळ निर्माण होतात व फायद्याऐवजीं व्यापाऱ्यांना त्यामुळें तोटाच येतो. कर भरण्याला व्यापाऱ्यांचा विरोध नसतो. पण किमान माणुसकीची वागणूक सरकारनें द्यावी एवढी अपेक्षा साहजिकच राहणार व अंमलबजावणी सोप्या पद्धतीनें व्हावी हा एकच उद्देश समोर ठेवून प्रचलित कायदे सुधारावे या प्रधान हेतूनें ही परिषद भरवीत आहोंत.

सेल्स टॅक्स, शॉप ॲक्ट, पेमेंट ऑफ वेजेस ॲक्ट, इन्कम–टॅक्स ॲक्ट, भेसळीचा कायदा (भेसळ प्रतिबंधक कायदा) वगैरे, सर्व कायद्यांच्या अंमलबजावणीचा जो नमुना सध्या पहावयास मिळतो तो पाहून या सर्व पद्धतींत सोपेपणा यावा व कायद्यासाठीं माणूस नसून माणसांसाठीं कायदा आहे हें धोरण असावें, या हेतूनें सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न या परिषदेमार्फत व्हावा अशी इच्छा आहे. या सर्व गोष्टीला मजबूत संघटना पाहिजे. जर व्यापारी वर्ग नेटानें व एकजुटीनें या प्रयत्नांत भाग घेईल तर इच्छित सुधारणा घडवून आणणें अशक्य आहे असें वाटत नाहीं. म्हणून सर्व व्यापारी वर्गाला आमची अशी कळकळीची नम्र विनंती आहे कीं, ही परिषद यशस्वी करण्यासाठीं, आपल्या ज्ञानाचा, अनुभवाचा व इतर सर्व बाबतींतील सहकार आपण द्यावा अशी प्रार्थना आहे. परिषद पुणें मुक्कामीं शिवाजी मंदिरांत रविवार तारीख २३ व सोमवार तारीख २४ फेब्रुवारी या दिवशीं घेण्याचें निश्चित केलें आहे. पार्लमेंटचे डेप्युटी स्पीकर श्री. दीनदयाळ गुप्ता हे अध्यक्षस्थान स्वीकारणार असून श्री. मुरारजी जे. वैद्य, मुंबई, हे परिषदेचें उद्घाटन करणार आहेत.

### पुणें जिल्हा व्यापारी परिषदेच्या सभासदांची वर्गणी

| | रु. |
|---|---|
| व्यापारी संस्था (प्रत्येक संस्थेतून ३ प्रतिनिधी) | २५ |
| स्वागत समिति सभासद | ५ |
| प्रतिनिधी | ३ |
| प्रेक्षक | १ |

परगांवाहून परिषदेस येणाऱ्या प्रतिनिधींची राहण्याची व जेवणाची सोय परिषदेमार्फत होणार आहे.

### पुणें जिल्हा व्यापारी परिषदेचें कार्यकारी मंडळ

नियंत्रक :—श्री. डी. बी. शहा
कार्याध्यक्ष :—श्री. ल. गो. सहस्रबुद्धे,
कार्पोरेटर, पुणें कॉर्पोरेशन.
स्वागताध्यक्ष :—श्री. मावजीभाई नानजी
खजिनदार :—शंकरलाल परशुराम वाघोलीकर
चिटणीस :—श्री. म. गो. कुलकर्णी
" श्री. वसंत शंकरराव हगवणे
कॉर्पोरेटर, पुणें कॉर्पोरेशन
" श्री. शांतीलाल सी. शहा वकील
जागा :—शिवाजीमंदिर, पेरूगेट, सदाशिव पेठ.
परिषद कार्यालयाचा पत्ता:—७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

**दक्षिण ध्रुवावर आराम**—दक्षिण ध्रुवावर जाण्यास निघालेल्या रशिअन टोळीनें आपल्या तळावर आरामशीर जीवनाची व्यवस्था केली आहे, अशी माहिती एका ऑस्ट्रेलिअन वार्ताहरानें प्रसिद्ध केली आहे. त्याच्या माहितीप्रमाणें रशिअन प्रवासी मजेंत आहेत. त्यांनीं आपल्या 'घरीं' ऊन पाण्याच्या टाक्या, विजेचा प्रकाश, कपडे धुण्याचीं यंत्रें, इत्यादींची व्यवस्था केली आहे.

श्री. वा. काळे ह्यांच्या कौटुंबिक पुस्तकांचे गुजराती अनुवाद.

'सस्तु साहित्य एटले उंचामां उंचुं साहित्य'

☞ સદાચારને પગલે अथवा શિષ્ટાચાર ☜

'पुढे पाऊल' ह्या दुसऱ्या पुस्तकाचा प्रा. शशिन ओझाकृत अनुवाद, विक्रीस तयार.

पृ. सं. १३७ ] ★ [ किंमत रु. १·२५

☞ સુખી જીવનની પગદંડી ☜

'कण आणि क्षण' च्या प्रा. ओझाकृत अनुवादाची दुसरी आवृत्ति.

पृ. सं. १६८ ] ★ [ किंमत रु. १·५०

सस्तु साहित्यवर्धक कार्यालय, अहमदाबाद

# कै. डॉ. किर्लोस्करांचें स्फूर्तिदायक चरित्र

## मीनाक्षी साने ह्यांची " श्रद्धांजलि "

स्टेथॉस्कोपबरोबर लेखणी व हातोडा प्रभावीपणें चालविणारे डॉक्टर, महाराष्ट्रांतील एंजिनिअरिंगच्या पहिल्या व यशस्वी कारखान्याचे जनक, बुद्धिनिष्ठ समाजसुधारक कै. डॉ. वा. का. किर्लोस्कर, ह्यांच्या यशस्वी आयुष्याचें सार त्यांची एक नात, मीनाक्षी साने, ह्यांनीं वस्तुनिष्ठपणें 'श्रद्धांजलि' ह्या पुस्तकाचे रूपानें सादर केलें आहे.

" चरित्र लिहिण्याची प्रेरणा आत्मप्रेम नसून, त्यांनीं केलेल्या कार्याचें समाजाच्या दृष्टीनें मला वाटणारें महत्त्व हेंच आहे " असा मीनाक्षीबाईंनीं प्रारंभीं खुलासा केला नसतां, तरी चाललें असतें; कारण सुशिक्षितांना माहीत असलेल्या मीनाक्षीबाईंच्या हातून आत्मप्रेमानें कोणालाहि मलते गुण चिकटविले जाण्याची भीतीच नव्हती. ३२ पृष्ठांच्या प्रस्तुत पुस्तकांत मीनाक्षीबाईंनीं कै. डॉ. किर्लोस्करांच्या स्फूर्तिदायक कर्तृत्वाचा परिचय साजेशा स्फूर्तिदायक भाषेंत करून दिला आहे. तो सर्वांनाच बोधप्रद वाटेल, ह्यांत संशय नाहीं.

१५ फेब्रुवारी, १९४९ रोजीं डॉ. वा. का. किर्लोस्कर ह्यांची इहयात्रा संपली. ते अशा रीतीनें जीवन जगले कीं, त्यांना दिवंगत होऊन दहा वर्षें होत आलीं तरी त्यांच्या एखाद्या मुलानें, सुनेनें अगर नातवंडानें " बाबा असते तर... " अशी त्यांची आठवण न काढतां क्वचितच एखादा आठवडा जात असेल! त्यांच्या यशस्वी आयुष्याचें सार जनतेपुढें ठेवण्यासाठींच हें छोटेंसें चरित्र मीनाक्षी साने ह्यांनीं लिहिलें आहे.

सध्यांच्या " स्फुटनिक युगा "चा ओघ फारच वेगाचा आहे. त्यामुळें हल्लीं भूतकाळावर फार भराभर पडदा पडत जातो. काल-परवा झालेल्या घडामोडी त्रेतायुगांत झाल्यासारख्या वाटतात! पण अशा वेगवान जीवनांतहि भूतकाळाशीं आपली साखळी तुटूं नये, विद्यमान पिढी जें कर्तृत्व करीत असतें तिच्यावर मावळलेल्या पिढीनें केलेल्या संस्कारांचा विसर पडूं नये, याची प्रत्येकानें दक्षता बाळगणें जरूर आहे. पूर्वजांबद्दल वाटणारी अशी श्रद्धा व्यक्त करण्यासाठीं लोक श्राद्ध करीत असावें. हें चरित्र लिहून काढण्यापाठीमागें लेखिकेची तीच भावना असल्याचें तिनें नमूद केली आहे.

डॉ. वासुदेव काशिनाथ किर्लोस्कर हे श्री. रामुअण्णा किर्लोस्कर व कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर ह्यांच्यांतील मधले बंधु. १८९० सालीं एल्. एम्. अँड एस्. ही त्यावेळची डॉक्टरीची उच्च परीक्षा पास झाल्यावर त्यांनीं सोलापूर येथें वैद्यकीय व्यवसाय सुरू केला, तो १९३८ पर्यंत, निवृत्त होईपर्यंत. ह्या व्यवसायांत त्यांनीं पहिल्या प्रतीचे डॉक्टर म्हणून लौकिक मिळविला. ते संपूर्णपणें बुद्धिप्रामाण्यवादी व सुधारक होते; त्यांच्या विचाराची ही बैठक अखेरपर्यंत विचलित झाली नाहीं. यंत्रयुगाच्या आगमनाबरोबर येणाऱ्या सामाजिक सुधारणांचें ते स्वागत करीत. अस्पृश्यांना दूर ठेवून, स्त्रियांना घरांतील पारतंत्र्यांत ठेवून, पूर्वीची चातुर्वर्ण्याची सामाजिक चौकट कायम ठेवून, औद्योगिक क्रांति पूर्ण होणार नाहीं असें त्यांना तीव्रपणें वाटत होतें. त्यांच्या सर्व आकांक्षांना साथ करणारी अशीच अर्धांगी—कै. सौ. लक्ष्मीबाई—त्यांना लाभली; त्यामुळें जहाल मतें प्रत्यक्ष आचारणांत आणणें शक्य झालें. किर्लोस्कर दंपतीच्या घरांतील वातावरणाचा सर्व नातेवाइकांवर अत्यंत चांगला परिणाम झाला; त्यांना कार्यप्रवण करून प्रोत्साहन मिळालें. नव्या पिढींतील मुलींना पुढें आणण्यासाठीं कै. सौ. लक्ष्मीबाईंची नेहमीं तळमळ असे. मरतांनाहि " आम्हीं परदेशी बांगड्या वापरणार नाहीं " अशी त्यांनीं आपल्या सुनांकडून शपथ घेवविली!

आपल्या एका लेखाच्या शेवटीं, मानवी धडपडीचा अंतिम हेतु काय आहे, हें सांगतांना कै. डॉ. किर्लोस्कर म्हणाले आहेत, " निसर्गावर वर्चस्व मिळवण्याच्या झगड्यांत रंगून जाणें व त्या झगड्यापासून प्राप्त झालेल्या ज्ञानानें मानवी सुखांत व समाधानांत भर घालणें हेंच मनुष्यप्राण्याचें जीवनकार्य आहे. " नाना शास्त्रांच्या साहाय्यानें मानवी जीवन सुलभ व कमीकमी कष्टमय झालें पाहिजे असें त्यांचें मत होतें. मेकॅनिक्स, एंजिनियरिंग यांसारख्या भौतिक विषयांचेंहि त्यांचें खूप वाचन होतें व हीं पुस्तकेंहि त्यांच्या टेबलावर पडलेलीं असावयाचीं. लिहिण्याच्या टेबलाशेजारीं ड्रॉइंगचा बोर्ड असून त्यावर निरनिराळ्या यंत्रांचीं चित्रेंहि वेळोवेळीं काढलीं जायचीं. आपल्या कल्पनांप्रमाणें प्रयोग करतां यावे यासाठीं शहरांत त्यांनीं एक छोटेंसें वर्कशॉप सुरू केलें. दर उन्हाळ्यांत महिनाभर किर्लोस्करवाडीस राहून आपले धाकटे बंधु कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्यासमवेत तेथील कारखान्यांतहि त्यांचे हे प्रयोग सुरू असावयाचे. कै. लक्ष्मणराव यांस किर्लोस्करवाडीचा कारखाना घालण्याच्या कामीं डॉक्टसाहेबांचें खूप पाठबळ होतें. पाणी काढण्याच्या मोटा, पेरणीचें यंत्र, हातमाग, गरम झरा, यांवर अनेक प्रयोग करून त्यांनीं एकंदर आठ पेटंट्स् मिळवलीं आहेत.

डॉक्टरांनीं शहरांत सुरू केलेल्या वर्कशॉपची वाढ झाल्यावर तें टिकेकरवाडीस नेण्यांत आलें. तें वर्कशॉप म्हणजेच शिवाजी कारखाना. आज हा कारखाना त्यांचे दोन चिरंजीव श्री. चिमणराव व श्री. श्रीकृष्णपंत व दोन नातू श्यामकांत व अरविंद हे चांगल्या रीतीनें चालवीत आहेत व वाढवीत आहेत. कारखान्याची स्थापना १९०० सालीं झाली. यापूर्वी महाराष्ट्रांत यंत्र-कारखाने नव्हते. आज किर्लोस्करांचे, ओगल्यांचे, वालचंद कंपनीचे व इतरांचे छोटे-मोठे अनेक कारखाने महाराष्ट्रामध्यें आहेत पण महाराष्ट्रांत एंजिनिअरिंग कारखाना सुरू करण्याचा पहिला मान डॉ. किर्लोस्करांना मिळाला आहे. तेव्हा "स्टेथॉस्कोपबरोबर लेखणी व हातोडा प्रभावीपणें चालविणारे डॉक्टर " असें त्यांचें वर्णन केलें तर त्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं.

डॉ. किर्लोस्कर यांच्या व्यक्तित्वाला चौफेर पैलू असल्यामुळें त्यांचा व्यासंगहि अनेक विषयांचा होता. त्यांच्या स्वतःच्या ग्रंथालयांत डिकन्सच्या कादंबऱ्या, महाभारत, रामायणाचे खंड, प्राचीन व अर्वाचीन काव्यें, तत्त्वज्ञान, इतिहास, जागतिक राजकारण, अशा विविध विषयांवरचीं पुस्तकें असत. अबदुल करीमखां हे तर त्यांचे शेजारी व पेशंट. संगीताच्या त्यांच्या नैसर्गिक आवडीमध्यें त्यांच्या स्नेहानें भरच पडली.

म. गांधींच्या चळवळीमागील साम्राज्यविरोधी भावनेबद्दल डॉ.

किर्लोस्करांना आदरभाव असला तरी म. गांधींनी त्या चळवळीला अध्यात्म, आश्रमवास, हृदयपरिवर्तन, इत्यादींचें जें अस्तर घातलें होतें तें त्यांच्या तर्कनिष्ठ विचारसरणीला कधीं रुचलें नाहीं. शिवाय म. गांधींचा एकंदरींत यांत्रिक सुधारणांनाच जो विरोध होता, तोहि त्यांना पटत नव्हता. 'गांधीवाद' म्हणून जो ओळखला जातो, तो त्यांना कधींच मान्य झाला नाहीं.

घरांतील नातवंडें १९३०–३२ च्या सुमारास कम्युनिस्ट झाली तेव्हां त्यांनीं त्यांना विरोध केला नाहीं. कोणाचेंहि म्हणणें नीट ऐकून त्यावर विचार करून मत बनवावयाचें, पूर्वग्रहदूषित वृत्ति बाळगायची नाहीं, असा त्यांचा उदार दृष्टिकोन असल्यानें ते त्यांच्याशीं शांतपणें चर्चा करूं लागले, त्यांची भूमिका समजावून घेऊं लागले. तेवढ्यासाठी त्यांनीं नवीन ग्रंथांचा अभ्यास सुरू केला आणि खरोखरच वयाच्या सतराव्या वर्षी मार्क्स, एंगल्स, लेनिन, यांचीं इतरांना थोडीं जडच असणारीं तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांवरील पुस्तकें त्यांनीं वाचायला सुरवात केली. एखादें पुस्तक समजलें नाहीं तर तें दोनदा, तीनदा, चारदा वाचलें व वाचनांच्या अखेरीस ते स्वतःच समाजवादी झाले. म. गांधींना आज आपण राष्ट्रपित्याचा मान देत असलों तरी 'गांधीवाद' म्हणून ज्याला म्हणतात तो मागें पडत असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें यांत्रिकीकरणावर विशेषत्वानें भर दिला जात असल्याचें आपण पाहातच आहों.

सत्तरीं उलटलेल्या ह्या गृहस्थांनीं तरुणालाहि लाजवील अशा हिरीरीनें या तत्त्वज्ञानाची लोकांना ओळख करून देण्यास प्रारंभ केला. त्यांनीं १९३४ पर्यंत, म्हणजे वयाच्या एकाहत्तराव्या वर्षापर्यंत, कधीं लेखन केलें नव्हतें. मात्र देशाच्या उत्थानासाठी समाजवादी विचारसरणीचाच अंगिकार करावयास पाहिजे हें पटल्यानंतर त्यांनीं एकदा लेखणी उचलली ती अखेरपर्यंत खाली ठेवली नाहीं. त्यांनीं एकूण सुमारें पन्नास लेख लिहिले व त्यामध्यें राजकीय, सामाजिक, शास्त्रीय, अशा निरनिराळ्या विषयांचा परामर्श घेतला.

डॉ. किर्लोस्करांच्या बाह्यात्कारी धीरगंभीर दिसणाऱ्या अंतःकरणांत मानवतेचें असेंच खोल अधिष्ठान होतें. घरांतील स्त्रियांनीं भाजीवाल्या बाईबरोबर पैसा दोन पैशांच्या भावासाठी घासाघीस घातलेली त्यांना कधीं खपली नाहीं. ज्या नोकरानें त्यांचें जन्मभर काम केलें त्या गड्याला त्यांनीं एक छोटेंसें घर बांधून तें बक्षिस देऊन टाकलें. प्रत्येक गोष्टींत—अगदीं बारीकसारीक गोष्टींतहि—त्यांची ही मानवता दिसून येई. कधीं कोणावर ते साधा आवाज चढवूनहि बोलले नाहींत. त्यामुळेंच त्यांचा धाक वाटे. तसेंच, संकटसमयीं अत्यंत मोकळेपणानें त्यांच्याशीं बोलून त्यांचा सल्ला घ्यावा असा मित्रभावहि वाटे. त्यांच्या असामान्य बुद्धिवैभवाला शोभेल अशा प्रभावी व्यक्तिमत्त्वाची जोडहि त्यांना लाभलेली होती.

सामाजिक जीवनांतील प्रत्येक प्रश्नाबाबत त्यांची बुद्धिनिष्ठ व धारवाडी काट्याप्रमाणें न्यायनिष्ठ दृष्टि होती. स्वतःच्या हितसंबंधांना धोका येतो, अगर लोक काय म्हणतील, म्हणून त्यांनीं आपल्या तत्त्वनिष्ठेला कोणतीहि मुरड घातली नाहीं. पण ते असे तत्त्वज्ञानी होते म्हणून जीवनाच्या इतर अंगांबद्दल ते उदासीन असावेत अशी त्यांच्याबद्दल कल्पना बाळगली तर ती सपशेल चुकीची होईल. बाह्यात्कारी ते गंभीर दिसत; पण संभाषणाला सुरवात झाल्यावर त्यांच्यांतील खेळकर विनोदाची चमक श्रोत्यांना दिसून येई.

कै. डॉ. वा. का. किर्लोस्कर ह्यांनीं सामाजिक व आर्थिक प्रगतीस साहाय्यभूत होतील असे विचार पेरण्याचे व ते विचार कृतींत उतरवून दाखविण्याचें कार्य यशस्वी रीतीनें केलें आहे. त्यांच्या प्रेरणेनें कितीतरी उपक्रमांना चालना मिळालेली आहे. मीनाक्षीबाईंच्या लेखणींतून उतरलेलें हें छोटेंसें चरित्र 'मी काय करूं शकेन ?' अशा प्रश्नाच्या चिंतनांत असणारांना खासच मार्गदर्शन करील.

---

## महात्मा गांधींच्या समाधीचें नियोजित स्वरूप

### आर्किटेक्ट, श्री. भुता, ह्यांचें डिझाइन पसंत

दिल्लीमधील राजघाटावरील महात्मा गांधींच्या स्मारक-समाधीसाठी मुंबईचे आर्किटेक्ट, श्री. जी. एम्. भुता, ह्यांच्या डिझाइनला मान्यता देण्यांत आली आहे. त्याकरितां ठेवलेल्या स्पर्धेसाठीं १०० डिझाइन्स आलीं होतीं. सर्वोत्कृष्ट डिझाइनची निवड करण्यासाठीं मध्यवर्ति सरकारनें एक समिति नेमली होती.

श्री. भुता ह्यांच्या डिझाइनमध्यें, चारी बाजूंना उतार असलेला चौरस मातीचा ढिगारा आहे. ढिगाऱ्याचे मध्यभागीं महात्माजींची समाधी १४ फूट खोल राहील. समाधीची खोली २५० चौ. फूट असेल. ह्या खोलीचे मध्य ठिकाणीं समाधी असेल. समाधीचे भोंवतीं झाडें व झुडपें लावण्यांत येतील. सध्यांची बाग मातीच्या ढिगाखाली बुडेल, पण परराष्ट्रीय पुढाऱ्यांनीं लावलेलीं झाडें कायम राखण्यांत येतील. समाधीकडे जाण्याला चार बाजूंनीं भुयारांतून वाट ठेवली जाईल. समाधीकडे खोलींतील भिंतींत गुहा केल्या जातील. त्या गुहांत व भिंतींवर चित्रें खोदण्यांत येतील.

समाधीकडे येणाऱ्या रस्त्यावर ४०'×४०'×४०' ह्या आकाराचा पोकळ पॉलिश्ड काळ्या दगडाचा (ग्रॅनाइटचा) स्तंभ उभारला जाईल. ह्या स्तंभाच्या भिंतींवर मोठे तेलाचे दिवे बसविण्यांत येतील. समाधीच्या भोंवतालचे जागीं यात्रिकांसाठी दगडी बसण्यांच्या जागा तयार केल्या जातील. वहातें पाणी सर्वत्र फिरतें ठेवलें जाईल.

---

## ताजमहाल रात्रीं बंद राहणार

ताजमहालमधील मौल्यवान दगडी फुलांच्या वाढत्या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी, रात्रींच्या वेळीं कोणालाहि प्रवेश ह्यापुढें मिळणार नाहीं. खास कारणासाठी विशेष प्रसंगीं मात्र हा नियम सैल केला जाईल.

---

## सुएझ कालव्याबाबत नुकसानभरपाई

सुएझ कालव्याच्या युनिव्हर्सल कंपनीच्या भागीदारांच्या सभेनें एकमतानें निर्णय घेऊन, इजिप्त सरकारशीं नुकसानभरपाई-बाबत वाटाघाटी करण्यासाठी फ्रेंच, ब्रिटिश व अमेरिकन प्रतिनिधींची नेमणूक करण्याचें ठरविलें. सुएझ कालव्याचें राष्ट्रीयीकरण मूळ कंपनीनें अशा रीतीनें मान्य केलें आहे.

---

## चार्लस मॉर्गन ह्यांचा मृत्यु

सुप्रसिद्ध ब्रिटिश कादंबरीकार व नाटककार, मि. चार्लस मॉर्गन, हे ६ फेब्रुवारी रोजीं मृत्यु पावले. 'पोर्ट्रेट इन ए मिरर', 'दि फौंटन,' 'दि व्हॉयेज' ह्या त्यांच्या पुस्तकांनीं पारितोषिकें मिळविलीं होतीं.

---

## प्रिन्स अलिखानची नेमणूक

पाकिस्तानचा युनायटेड नेशन्समधील कायम प्रतिनिधी म्हणून, प्रिन्स अलिखान ह्याची नेमणूक करण्यांत आली आहे. खेळांचा शौक व संपत्ति ह्याबद्दल तो प्रसिद्ध आहे.

## मुंबई सहकारी कायद्यावरील लाड समितीचा अहवाल

(लेखकः श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलएल्. बी. पुणें ४)

(लेखांक ३)

सहकारी संस्थांना सांपत्तिक स्थैर्य यावें व सभासदांकडून येणें रकमांची पूर्ण वसुली व्हावी याबाबत विशिष्ट तरतुदी नियोजित सहकारी कायद्यांत करणें क्रमप्राप्त झालें होतें. सहकारी संस्थांकडून घेतलेलीं कर्जें वेळच्यावेळीं परत केलीं जात नाहींत, इतकेंच नव्हे तर संस्थांकडून होणाऱ्या वसुलीच्या कामीं कांहीं अप्रामाणिक सभासद अडचणी निर्माण करून वाजवी देणें बुडवणेच्या दृष्टीनें कारवाया करूं लागतात. कोणी सभासद आपल्या स्थावर इस्टेटीच्या वांटण्या करून टाकतात तर कोणी दुसऱ्या नातेवाईकांच्या नांवानें वर्ग करून मोकळे होतात. पर्यायानें कागदी लवादनामे संस्थेजवळ राहून वसुली करणें अशक्य होऊन बसतें. ह्याबाबत योग्य ती तरतूद केल्याशिवाय तरणोपाय राहिला नसलेमुळें त्यांतील कांहीं योजना नियोजित कलमांत केलेचें दिसतें.

### प्रतिज्ञा लेख

कर्जदार सभासदांस सोसायटीकडून कर्ज घ्यावयाचें असल्यास त्याच्या स्वतःच्या जमिनीबाबत अगर ज्या जमिनींत त्याचे कुळाचे संबंध असतील त्याबाबत प्रथम त्यानें सोसायटीस प्रतिज्ञालेख लिहून दिला पाहिजे व त्याआधारें त्यानें पुढें सोसायटीकडून मिळणाऱ्या कर्जाबाबत सदरचे जमिनीवर बोजा निर्माण केलेला आहे असा निर्वाळा देवून ठेवला पाहिजे. सहकारी संस्थेकडोन सभासद जितकें कर्ज घेईल तें कर्ज त्यावरील व्याज या सर्व रकमेच्या परतफेडीसाठी अशा स्वरूपाचा बोजा निर्माण करून दिल्याशिवाय त्यास कर्ज मिळणार नाहीं. तसेंच प्रस्तुतचा कायदा अंमलांत आल्यावर त्यापूर्वीं जे कोणी सभासद असतील व ज्यांच्याजवळ जमिनी असतील अशाहि सभासदांनीं वर नमूद केलेप्रमाणें प्रतिज्ञापत्रक भरून दिलें पाहिजे. असें केल्याशिवाय त्यांना सभासदांचे हक्क बजावतां येणार नाहींत. अशा तऱ्हेनें करून दिलेल्या प्रतिज्ञालेखांत सहकारी संस्थेच्या मंजुरीनें योग्य ते फेरफार सभासदांस करून घेतां येतील. सभासदाच्या येणें रकमेची संपूर्ण फेड झालेखेरीज सभासदास त्याची जमीन अगर त्यांतील भाग इतरांस तबदील करतां येणार नाहीं. एखाद्या सभासदानें रकमेची संपूर्ण फेड न करतां जमीन तबदील केल्यास असा व्यवहार मूलतः बेकायदेशीर होऊन त्यावरून कोणासहि कांहींहि हक्क प्राप्त होणार नाहींत.

### कर्जपुरवठ्याची जबाबदारी

ही योजना अंमलांत आणली गेल्यास सहकारी संस्थांच्या येणे रकमा बुडणार नाहींत. परंतु त्याचबरोबर आणखी एक महत्त्वाची बाब ध्यानांत घेतली पाहिजे व ती म्हणजे सहकारी संस्थेंतील जितक्या सभासदांनीं संस्थेकडे प्रतिज्ञालेख लिहून दिले असतील त्या सर्वांना योग्य वेळीं कर्जपुरवठा उपलब्ध करून देणेची जबाबदारी त्या संस्थेवर राहील. सभासदांनीं प्रतिज्ञालेख लिहून दिलेवर त्या जमिनीवर सहकारी संस्थेचा प्रतिज्ञालेखानें बोजा निर्माण होणार आहे. अशावेळीं दुसरीकडे कांहींहि कर्ज मिळणेची सोय राहाणार नाहीं व अशावेळीं सभासदांस सोसायटीकडून जरूरीच्या वेळीं कर्ज न मिळाल्यास शेतीचा हंगाम हातचा जाऊन त्याचें अतोनात नुकसान होईल. कर्जपुरवठा किती प्रमाणांत करावयाचा, त्यामुळें किती सभासदांची कर्जाची अडचण भागवतां येईल व दिलेलें कर्ज त्यांच्या अडचणी निवारण्यास खरोखरीच उपयोगी पडणार आहे किंवा कसें ह्याचा बारकाईनें विचार करून क्रमबद्ध अशी योजना आंखल्याशिवाय तरतुदीची योग्य अंमलबजावणी करतां यावयाची नाहीं. आणखी एक महत्त्वाची बाब विचारांत घेतली पाहिजे व ती ही कीं, ज्या सभासदांनीं संस्थेकडून कर्ज घेतलें आहे त्यांनीं तें विशिष्ट मुदतींतच परत केलें पाहिजे. अशा सभासदांनीं वेळेवर कर्ज परत न केल्यास इतर गरजू सभासदांना कर्जपुरवठा करणें त्या सहकारी संस्थेस कठीण होईल व त्याचा परिणाम धान्योत्पादनावर होऊन गरजवंत सभासदाचें अतोनात नुकसान होईल.

---

### सरकारी खर्चानें वैद्यकीय मदत कोणत्या पत्नीला मिळणार ?

पाकिस्तानांतील सरकारी नोकराच्या अनेक पत्नींपैकीं एकीलाच सरकारी खर्चानें वैद्यकीय मदत मिळूं शकेल. ह्या मदतीच्या लाभासाठी सरकारी नोकरानें आपल्या पत्नींपैकीं कोणाहि एकीची निवड करावी; पण एकदा ही निवड करून सरकारला कळविली, म्हणजे त्या पत्नीच्या हयातींत त्यांत बदल करतां येणार नाहीं.

---

### ग्रेट ब्रिटनमधील स्त्रियांत धूम्रपानाची वाढ

ग्रेटब्रिटनमधील पुरुषांच्या धूम्रपानांत १९३९ च्या मानानें वाढ झालेली नाहीं, पण स्त्रियांचें धूम्रपान तिप्पट झालें आहे. धूम्रपान करणारा पुरुष दररोज सरासरीनें १८ सिगारेटस ओढतो, तर धूम्रपान करणारी स्त्री १० सिगारेट संपविते. प्रत्येक १०० पुरुषांत ७५ पुरुष व प्रत्येक १०० स्त्रियांत ४१ स्त्रिया धूम्रपान करतात.


दि

# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक

—भांडवल—

वसूल भांडवल (भागापोटी आगाऊ भरलेल्या रकमा धरून) रु. १३,५०,०००चे वर

गंगाजळी व इतर निधि रु. ११,५०,०००

खेळतें भांडवल रु. नऊ कोटींचे वर

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष)

श्री. धों. कृ. साठे श्री. फ. दो. पदमजी

श्री. मा. वी. शहा श्री. भा. म. गुप्ते

श्री. म. वा. जांभेकर श्री. म. स. पारखे

पुण्यांत नवीन शाखा

पुण्याचे वाढलेले स्वरुप लक्षांत घेऊन महाराष्ट्र बँकेने शहरांत दोन नवीन शाखा उघडल्या आहेत. २९५ सोमवार पेठ, सेडकर बिल्डिंग, रास्ते वाड्यासमोर व टिळक रोड, माटे बिल्डिंग, पर्वती रस्त्याजवळ, येथें नव्यानें उघडलेल्या शाखांचा त्या विभागांतील जनतेनें फायदा घ्यावा.

कामाच्या वेळा : सोमवार ते शुक्रवार सकाळीं ८-३० ते १०-३०
सायंकाळीं ५ ते ६-३०
शनिवारीं सकाळीं ८-३० ते १०-३० फक्त

पुणें कॉर्पोरेशनचे हद्दींत आतां बँकेच्या पांच शाखा काम करीत आहेत.

मुख्य कचेरी, पुणें २. चिं. वि. जोग, मॅनेजर.

**कामगारांसाठी घरांची सोय**— उत्तर प्रदेश सरकारनें डेहराडून जिल्ह्यांतील चहाच्या मळयावर काम करणाऱ्या कामगारांसाठी घरांची सोय करण्याचें ठरविलें आहे. ह्या वसाहतीसाठी सरकारला ९ लक्ष रुपये खर्च करावे लागतील असा अंदाज आहे. अशा प्रकारची ही तिसरी योजना असून तिचा खर्च मध्यवर्ती सरकारकडून राज्य सरकारला मिळणार आहे.

**योग विद्यापीठाची स्थापना**—संरक्षण खात्याचे संसदीय चिटणीस श्री. फत्तेसिंहराव गायकवाड ह्यांनीं सुरत येथें योग विद्यापीठाच्या पायाभरणीचा दगड बसविला. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले कीं, योग ही भारताची जगाला देणगी आहे. योग तत्त्वज्ञानामुळें जगांत शांति प्रस्थापित करणें व नैतिक निष्ठा पुन्हां जागृत करणें शक्य होईल.

**शीतज्वराच्या सांथीचें कारण**—आशिआंतील देशांतून गेल्या वर्षीच्या मध्याच्या सुमारास आलेली शीतज्वराची साथ अणुबॉम्बसच्या स्फोटामुळें उत्पन्न झालेल्या किरणोत्सर्गी ढगांमुळें आली, असें मत एका इटालिअन शास्त्रज्ञानें व्यक्त केलें आहे. इटालियन शास्त्रज्ञानें जिवंत प्राण्यावर केलेल्या प्रयोगावरून हें मत बनविलें आहे. त्याला एका फ्रेंच शास्त्रज्ञाचाहि पाठिंबा आहे.

**किरणोत्सर्गाच्या परिणामाचा अभ्यास**—अणुबॉंबच्या स्फोटानंतर होणाऱ्या किरणोत्सर्गामुळें माणसावर काय परिणाम होतो त्याचा अभ्यास संयुक्त राष्ट्र-संघटनेतर्फे गुप्त रीतानें करण्यांत येत आहे. ह्या अभ्यासांत १५ देशांतील शास्त्रज्ञ सहभागी झाले आहेत. जगांतील ३० सरकारांकडून आलेल्या १६० अहवालांच्या आधारानें ते ह्या विषयाचें परिशीलन करणार आहेत.

**गणितज्ञ छोट्या यंत्राचा शोध**—रशिअन शास्त्रज्ञांनीं विजेच्या साह्यानें अवघड गणितें सोडविणारें एक छोटें यंत्र शोधून काढलें आहे. त्याचें वजन अवघे १०० पौंड आहे. जें गणित सोडविण्यास एकाद्या तज्ज्ञ गणितज्ञाला महिनेच्या महिने कष्ट करावे लागतील असें अवघड गणित हें यंत्र अवघ्या १०० सेकंदांत सोडवितें.

**पश्चिम जर्मनींतील प्रयोग**—हैड्रोजन बॉंबमध्यें उपयोग केल्या जाणाऱ्या स्फोटक शक्तीवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयोग आतां पश्चिम जर्मनींतहि करण्यांत येणार आहेत. सुप्रसिद्ध मॅक्स प्लँक इन्स्टिटयूटमध्यें जर्मन शास्त्रज्ञ ह्याविषयीं प्रयोग सुरू करणार आहेत. प्रयोगांत ब्रिटनमध्यें व अमेरिकेंत जी पद्धत वापरण्यांत आली आहे तिचाच उपयोग करण्यांत येणार आहे.

**अमेरिकन नटीचें स्वागत**—भारताचा प्रजासत्ताक दिन मॉस्को येथें साजरा होत असतांना अमेरिकन नटी एलिझाबेथ टेलर एकाएकीं समारंभाला उपस्थित झाली. भारताचे वकील श्री. मेनन ह्यांनीं, अर्थात् तिचें स्वागत केलें. ती आल्याबरोबर अगदीं थोडा वेळ कां होईना, पण समारंभाला जमलेल्या लोकांचें लक्ष कम्युनिस्ट पक्षाचे प्रमुख मि. क्रुश्चेव्ह ह्यांच्याकडून तिच्याकडे आकृष्ट झालें.

**घारापुरीची लेणीं**— मुंबईपासून जवळ असलेल्या एलेफंटा बेटांतील लेणीं पहाण्यासाठीं हौशी प्रवासी नेहमीं जात असतात. त्यांना घेऊन येणाऱ्या बोटीसाठी जो धक्का आहे त्याची दुरुस्ती व सुधारणा करण्याचें काम मुंबई सरकारनें सुरू केलें आहे. ह्या कामासाठीं मध्यवर्ती सरकारनें सुमारें ३ लाख रुपये मंजूर केले आहेत.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स

# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. | श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी | श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.